# चंद्रपूर जिल्हा राजपत्र क्रमांक ३५/२०२३
# दिनांक २८/०८/२०२३ ते ०१/०९/२०२३ पर्यन्त

**:: अनूक्रमणिका ::**

| | | |
|---|---|---|
| १) भाग १ | :- बक्षीस | ( निरंक) |
| २) भाग २ | :-शिक्षा | ( पान.क्र.०२ ते ०५) |
| ३) भाग ३ | :-बदली/नेमणूक/प्रशिक्षण | ( पान.क्र.०६ ते १३) |
| ४) भाग ४ | :-रजा | ( पान.क्र.१४ ते १४) |
| ५) भाग ५ | :-संकिर्ण | ( पान.क्र.१५ ते २०) |

( सौ.राधिका सु.फडके )
पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक चंद्रपुर,करिता

सर्व ग्रेढोट २०२३ चे CHANDRAPUR - POLICE या site वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**CHANDRAPUR – POLICE**

↓

**HOME**

↓

**FLASH**

↓

**POLICE GAZETTE**

# भाग २ :-शिक्षा

क्रमांक: पोअचं/विचौ–२/चापोअं–१५७० /भर्रे/निलंबन आदेश/२०२३ चंद्रपूर, दिनांक :–३० /०८/२०२३

## निलंबन आदेश

तुम्ही, चापोशि/१५७० संजय दशरथ भर्रे, पोलीस स्टेशन नागभिड येथे नेमणुकीस असतांना दिनांक २७/०८/२०२३ रोजी पोउपनि प्रशांत खोब्रागडे, नापोअं/१७३४ योगेश शिवनकर, पोअं/२३३२ संदेश देवगडे, पोअं/२५२२ अजय कटाईत, पोअं/१६३ विजय मैंद पो.स्टे. ब्रम्हपुरी हे पेट्रोलींग करीत असतांना गुप्त खबऱ्याकडुन मिळालेल्या खबरेवरून फुलेनगर उदापुर येथे चौकात काही ईसम तासाच्या ५२ पत्यावर पैशाची बाजी लावुन कटपत्ता जुगाराचा पैशाच्या हारजीतचा जुगार खेळ खेळीत आहेत. अशी खबर मिळाल्याने त्या ठिकाणी धाड टाकली असता तुम्ही आरोपी १) संजय दशरथ भर्रे, वय ४८ वर्ष, धंदा नौकरी चालक पोलीस अंमलदार ब.नं. १५७० पो.स्टे. नागभीड, रा. फुलेनगर उदापुर, त. ब्रम्हपुरी, २) तेजाबसिंग ज्योतिसिंग बावरी, वय २६ वर्ष, रा. धामना वार्ड, नागपुर , ३) आतीश हरीचंद्र ठेंगरी, वय ३८ वर्ष, रा. कहाली त. ब्रम्हपुरी व ४) महेंद्रसिंग लक्ष्मणसिंग जुनी, वय २७ वर्ष, रा. फुलेनगर, उदापुर ता. ब्रम्हपुरी हे जुगार खेळतांना मिळुन आले.

तुमचे अंगझडती व डावावरून नगदी १९८१०/–रू व तासाचे ५२ पत्ते किं. ५०/–रू. असा एकुण १९८६०/– रू. चा माल मिळुन आल्याने तुमच्या विरूध्द पोलीस ठाणे ब्रम्हपुरी येथे अप क्र.४१८/२०२३ कलम १२(अ) मजुका अन्वये दिनांक २७/८/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे तुम्ही सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळुन पोलीस दलास अशोभनिय व पोलीस खात्याची प्रतिमा मलीन करणारे कृत्य केले आहे. सदर प्रकरण चौकशीत असल्याने तुम्हाला निलंबित करणे आवश्यक वाटते, म्हणुन मी पोलीस अधीक्षक, चंद्रपुर, मुंबई पोलीस शिक्षा व अपील १९५६ मधील नियम ३ (१)(१–अ) (एक)(ब) या अधिकाराचा वापर करून तुम्हाला हा आदेश प्राप्त झाल्याचे दिनांक व वेळेपासुन **निलंबित** करण्यात येत आहे.

२. सदरहु आदेश अस्तित्वात असे पर्यंतच्या कालावधीत त्यांचे निलंबनाचे मुख्यालय, पोलीस मुख्यालय, चंद्रपुर हे राहील. सदरहु कालावधीत त्यांना पोलीस अधीक्षक/पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), चंद्रपुर यांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडून इतरत्र जाता येणार नाही.

३. निलंबन कालावधीत त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी/विदेशी सेवा आणि निलंबन बडतर्फी व नोकरीतुन कमी करणे या कालवधीतील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ६८ नुसार उदरनिर्वाह भत्ता देण्यात येईल.

४. निलंबनाचे कालवधीत त्यांना कोणत्याही प्रकारची खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही आणि जर त्यांनी अशा प्रकारची नोकरी अथवा व्यवसाय केल्यास ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ च्या नियम १६ नुसार गैरवर्तणूक म्हणुन समजण्यात येईल व त्यामुळे ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील. याशिवाय सदर कृतीमुळे त्यांना देय असलेला उदरनिर्वाह भत्ता ते गमावतील.

५. त्यांनी निलंबन कालावधीमध्ये पोलीस मुख्यालय, चंद्रपुर येथे दररोज सकाळी व सायंकाळी नियमितपणे हजेरी घ्यावी. गैरहजर राहील्यास उदरनिर्वाह भत्ता रोखून धरण्या येईल. तसेच त्यांचेकडील किट साहित्य जमा करून घेण्यात यावे.

क्रमांक :- पोअचं/विचौ-२/पो..कर्म/निलं.आदेश/नोंद/२३
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपुर
दिनांक :- ०१/०९/२०२३

**विषय:**- निलंबन आदेश नोंद केल्याबाबत.

**संदर्भ :**- कार्यालयीन आदेश क्रमांक पोअचं/विचौ-२/चापोअं-१५७०/भर्रे/निलंबन आदेश/२०२३, दिनांक ३०/०८/२०२३

०००

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना वरील आदेशान्वये निलंबित करण्यात आले असुन सदर आदेश नोंद केल्याचा दिनांक त्यांच्या नांवासमोर नमूद केल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निलंबित कर्मचारी यांचे नांव | निलंबन आदेश नोंद केल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | चापोशि/१५७० संजय दशरथ भर्रे | दि.३१/०८/२०२३ |

**क्रमांक :-** पोअचं/विचौ-२/प्राचौ/मनापोअं-८३ परविन पठाण/अंआ/२०२३ चंद्रपूर, दिनांक २९/८/२०२३.

**अंतिम आदेश**

**नाव** : मनापोअं/८३ परविन दिलावखॉ पठाण,नेमणूक भरोसा सेल,चंद्रपूर .

**वाचा :-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअचं/विचौ-२/मनापोअं-८३/परविन पठाण/प्राचौ/२०२३, दिनांक १९/६/२०२३

०००

तुम्ही, मनापोअं/८३ परविन दिलावरखॉ पठाण, भरोसा सेल,चंद्रपूर येथे नेमणूकीस असतांना खालीलप्रमाणे कसूर केला आहे.

" तुम्ही, मनापोअं/८३ परविन दिलावरखॉ पठाण,भरोसा सेल,चंद्रपूर येथे नेमणूकीस असतांना दिनांक १०/२/२०२३ रोजी भरोसा सेलच्या प्रभारी अधिकारी मपोउपनि अश्विनी वाकडे या कार्यालयात पोनि लता वाढीवे, पोउपनि जंगमवार व इतर कर्मचारी यांचेसह हजर असतांना त्यांचेकडे नागपूर येथील प्रोफेशनल स्किल अपग्रेडेशन प्रशिक्षणा दरम्यानच्या दोन ऐवजी साप्ताहिक रजा मिळण्याबाबत अर्ज सादर केला होता. त्यावेळी प्रभारी अधिकारी मपोउपनि अश्विनी वाकडे यांनी तुमच्या डयूटी पासवरुन तुम्हाला दिनांक ४/२/२०२३ चे १५.३० वाजता सोडले आहे व दिनांक ५/२/२०२३ ची साप्ताहिक रजा उपभोगली आहे, असे म्हटले असता तुम्ही तेथे हजर असलेल्या वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी यांचेसमक्ष प्रभारी अधिकारी मपोउपनि अश्विनी वाकडे यांचेसोबत जोरजोरात, तुम्ही कशा आहात, मला माहीत आहे, नेहमीचेच नाटक आहे, रजा देत नसाल तर वरिष्ठांकडे जाऊ असे उध्दटपणे, त्यांच्याशी हातवारे करुन बोलून भांडण केले. अशाप्रकारे तुम्ही आपले वरिष्ठांसोबत अतिशय उर्मट व उध्दटपणे वागून आपले पदास न शोभणारे, अत्यंत बेजबाबदार व पोलीस खात्याचे शिस्तीचे विरुध्द अंत्यत बेशिस्तपणाचे असे गैरवर्तन केले आहे ."

तुम्ही केलेल्या वरील कसूरीबाबत मी,पोलीस अधीक्षक,चंद्रपूर महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील नियम ३(२)(५) अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन तुम्हाला **" देय असलेली पुढील वार्षीक वेतनवाढ २ (दोन) वर्ष स्थगीत ठेवणे "** या प्रस्तावित शिक्षेचा कारणे दाखवा नोटीस आला होता. सदर नोटीस कसुरदार यांना तामिल करण्यात आला असुन कसुरदार यांनी विहीत मुदतीत उत्तर सादर केलेले आहे. कसूरदार यांनी उत्तरात नमूद केले आहे की,त्या दि.२२/१/२०२३ रोजी प्रोफेशनल स्किल अपग्रेडेशन या प्रशिक्षणाकरीता नागपूर येथे गेल्या होत्या.त्या दि.६/२/२०२३ रोजी कर्तव्यावर हजर झाल्या.दि.१०/२/२०२३ रोजी प्रशिक्षाणा दरम्यान न उपभोगलेल्या दोन साप्ताहिक रजा मंजूरीकरीता अर्ज पोउपनि अश्विनी वाकडे,प्रभारी अधिकारी, भरोसा सेल यांच्याकडे सादर केला होता.त्यावेळी पोउपनि वाकडे त्यांना, ' तुला घरदार आहे की,नुसती बाहेर राहते ',अशा अपमानित करुन बोलल्या. त्यावेळी त्या ' मॅडम,माझ्या घरापर्यंत जाऊ नका,तुम्हाला सुट्टी द्यायची नसेल तर तसे लिहून द्या,मी वरीष्ठांकडे जाईल ', असे फार नम्रतेने बोलल्या. त्यावर पोउपनि वाकडे मॅडम परत त्यांना ' तुला तर वरिष्ठांकडे जायची सवय आहे',असे म्हटले.त्यांनी पोउपनि मॅडम यांना ' तुम्ही यापूर्वी एक दिवसाची किरकोळ सुट्टी होम डीवायएसपी मॅडमकडे पाठविली आहे',असे म्हटले तेव्हा पोउपनि मॅडम यांनी जोरजोरात ओरडून स्टॉफ ला बोलावले. तिथे असलेल्या पोनि वाढीवे मॅडम यांनी पोउपनि वाकडे मॅडम यांना,जाऊ द्या,कशाला प्रकरण वाढविता,असे समजाविले. परंतू पोउपनि मॅडम यांनी,आज मी फायनल करते,हिचे नेहमीचेच नाटक आहे,असे जोरजोरात ओरडून म्हटले. त्यानंतर त्या तिथून निघून गेल्या. पोउपनि मॅडम त्यांना नेहमीच डिवचून व अपमानित करुन बोलतात. त्यांना राष्ट्रीय मानवाधिकार,नवी दिल्ली यांच्याकडून मिळालेला पुरस्कार पोलीस महासंचालक,मुंबई यांच्या हस्ते देऊन सम्मानित करण्यात आले आहे. त्यांनी वागण्यात नेहमीच नम्रपणा व प्रामाणिकपणा बाळगला आहे.

कर्तव्यात कधीही उर्मटपणे,हातवारे करुन वागल्या नाही. यापूर्वीच्या सेवाकाळात कोणतीही मोठी शिक्षा नाही,भविष्यात अशाप्रकारचे कृत्य घडणार नाही,याची ग्वाही देते.

कसूरदार यांच्या उत्तराचे काळजीपूर्वक अवलोकन केले. कसूरदार यांच्या कसूरीबाबत प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. प्राथमिक चौकशीत पोनि वाढीवे मॅडम सह इतर स्टॉफ यांचे बयाणावरुन त्यांनी एक साप्ताहिक रजा उपभोगलेली असतांना प्रशिक्षण कालावधीमधील दोन साप्ताहिक रजेची मागणी केली व या मुद्यावरुन त्यांच्या व प्रभारी अधिकारी पोउपनि वाकडे मॅडम यांच्यामध्ये वाद झाल्याचे दिसून येत असून कसूरदार यांनी त्यांचे वरिष्ठांसोबत उर्मट व उध्दटपणे वागून तसेच जोरजोरात बोलून गैरवर्तन केल्याचे दिसून आले आहे. पोलीस खात्याची शिस्त व वर्तणूक याबाबत त्यांना पुर्ण माहिती आहे. तरीसुध्दा त्यांनी त्यांच्या प्रभारी अधिकारी यांच्यासोबत इतर स्टॉफ समोर साप्ताहिक रजेच्या कारणावरुन जोरजोरात ओरडून वाद घालून, उर्मटपणे बोलून अशोभनीय व बेशिस्तपणाचे असे गैरवर्तन केलेले आहे. त्यामूळे त्यांचे म्हणणे समाधानकारक वाटत नाही. त्यांचे कसूरीचे स्वरुप पाहता त्यांना केलेली प्रस्तावित शिक्षा हि उचित असल्याने त्यांना प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेत कोणताही फेरबदल न करता खालीलप्रमाणे शिक्षेचे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी, रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी,पोलीस अधीक्षक,चंद्रपूर या आदेशाद्वारे मनापोअं/८३ परविन दिलावखॉ पठाण,नेमणूक भरोसा सेल,चंद्रपूर यांना त्यांचे उपरोक्त कसूरीबाबत महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील नियम ३(२)(५) अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन **" देय असलेली पुढील वार्षीक वेतनवाढ २ (दोन) वर्ष स्थगीत ठेवणे "**हि शिक्षा देण्यात येत आहे. सदर शिक्षेचा कालावधी हा सर्व रजा वगळुन (किरकोळ रजा सोडुन) गणण्यात येईल. सदर शिक्षेचा परिणाम त्यांचे पुढील वेतनवाढीवर होणार नाही.

सदर आदेशाने आपण व्यथीत झाले असल्यास हा आदेश नोंद केल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत विशेष पोलीस महानिरीक्षक,नागपूर परिक्षेत्र,नागपूर यांचेकडे द्विप्रतीत योग्य माफतीने अपिल दाखल करु शकता.

क्रमांक:पोअचं/विचौ–३/सफौ–११५४,पोहवा–१८७९,नापोअं–११२१/आदेश/२३, चंद्रपुर, दि. २८/०८/२०२३

## आदेश

तुम्ही, (१) सफौ/११५४ विलास शेंडे, (२)पोहवा/१८७९ कृष्णा पगाडे, (३)नापोअं/११२१ ललित धुंदे, पोलीस मुख्यालय, चंद्रपूर येथे नेमणुकीस असतांना तुमची दिनांक ०७/०५/२०२३ रोजी ईरई डॅम सुरक्षा गार्ड डयुटी लावली असतांना मा. पोलीस अधीक्षक साहेब चंद्रपूर यांनी दिनांक ०७/०५/२०२३ चे १७.००वा. स्वत: ईरई डॉम सुरक्षा गार्ड डयुटी चेक केली असता, तुम्ही गैरहजर आढळुन आलेले आहे.

ईरई डॅम येथील मुख्य सुरक्षा गार्ड ईचार्ज म्हणुन तुम्ही सफौ/११५४ विलास शेंडे व त्यांचे अधिनिस्त पोलीस अंमलदार हे २४ तास सुरक्षेच्या दृष्टीने अतिदक्षतेत राहणे तसेच सतर्क राहीणे अनिवार्य असतांना सुध्दा तुम्ही सुरक्षा गार्ड डयुटीवर दुर्लक्ष करून गार्ड डयुटीवरून कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनधिकृतपणे गैरहजर आढळुन आले आहे. अशा प्रकारे तुम्ही आपले पदास न शोभणारे अत्यंत बेशिस्त बेजबाबदारपणाचे, निष्काळजीपणाचे व कर्तव्यच्युतीचे असे गैरवर्तन केल्याने तुम्हाला दिनांक ९/८/२०२३ रोजी मा.पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे आज्ञांकित कक्षेत बोलविण्यात आले असुन तुमचे म्हणणे ऐकुण घेण्यात आले आहे. तुमचे म्हणणे संयुक्तीक वाटत असल्याने तुम्ही यापुढे अशा प्रकारचे गैरवर्तन करू नये म्हणुन तुम्हाला मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ मधील नियम ३ (२),(२) नुसार **"सक्त ताकीद "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

महाराष्ट्र पोलिस (शिक्षा व अपील) १९५६ मधील नियम ७ तरतुदी प्रमाणे सदर आदेशाविरूध्द अपील अनुज्ञेय नाही.

क्रमांक:पोअचं/विचौ–३/पोहवा–१९९६ खुशाल गौरकार/अं–आ./२०२३, चंद्रपुर, दि. २५/०८/२०२३

## अंतिम आदेश

**नाव:** पोहवा/१९९६ खुशाल गौरकार, नेमणुक पोलिस स्टेशन,गोंडपिपरी.

**वाचावे** : या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअचं/विचौ–३/पोहवा–१९९६ खुशाल गौरकार/२३,दिनांक ०८/०३/२०२३

"तुम्ही, पोहवा/१९९६ खुशाल गौरकार, पोलीस स्टेशन, गोंडपिपरी येथे मुद्देमाल मोहर्रर तसेच कर्तव्य वाटप अंमलदार चा कार्यभार पाहात असतांना दिनांक ३०/०१/२०२३ रोजी ठाणे प्रभारी अधीकारी यांनी मुद्देमाल कक्षात येऊन तुमच्याकडील अभिलेखाची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटया आढळुन आलेल्या आहे.
(१) भाग–५ चे मुद्देमाल रजीस्टर मध्ये अप. क्र. २७७/२०१९ मध्ये जप्त मुद्देमालापैकी चांदीच्या २ कमरपटयाचे सराफा व्यावसायिकाने ३२ ग्रॅम वजनाचे प्रमाणपत्र दिले असतांना तुम्ही मुद्देमाल क्रमांक २८/२०००, क्रमांक २ मध्ये चांदीच्या कमरपट्टा २ नग वनज ५ तोळे किंमत रूपये २५००/– अशी किंमती मुद्देमालाची चुकीची पावती दिली व त्याप्रमाणे रजीस्टरला चुकीची नोंद घेतली.
(२) मा.सत्र न्यायालय, चंद्रपूर यांनी पोलीस ठाणे गोंडपिपरी अप.क्र.६५/२०१९ मधील जप्त मुद्देमाल मा.न्यायालयात हजर करण्याच्या वारंवार सुचना दिल्या असतांना तसेच प्रभारी अधिकारी यांनी सुध्दा लेखी व तोंडी सुचना देऊन सुध्दा सदर मुद्देमाल मा. न्यायालयात दाखल केला नाही.
(३) मा.न्यायालयातुन निकाली निघालेल्या केसेस मधील मुद्देमालाची वेळीच निर्गती न करणे
(४) तपासी अंमलदार यांना वेळीच मुद्देमाल पावती न देणे

याशिवाय तुम्ही तुमच्याकडील अभिलेख अद्यावत करण्यास दिरंगाई केलेली आहे. तसेच कर्तव्य वाटप करतांना दुजाभाव करून सहकाऱ्यांसोबत वाद करता त्यामुळे तुमच्याबाबत सहकाऱ्याच्या मनात असंतोष पसरलेला आहे. अशा प्रकारे तुम्ही मुद्देमाल मोहर्रर म्हणुन आपले कर्तव्यात अत्यंत निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा केलेला असुन कर्तव्य वाटपात दुजाभाव करून आपले पदास अशोभनीय असे गैरवर्तन केले आहे."

वरील कसुरीबाबत कसुरदार यांना महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ मधील नियम– ३(२)(५) मधिल तरतुदी नुसार **"देय असलेली पुढील वार्षीक वेतनवाढ ३ (तिन) वर्ष स्थगीत ठेवणे"** या प्रस्तावित शिक्षेचा कारणे दाखवा नोटिस दिनांक ०८/०३/२०२३ रोजी देण्यात आला होता. सदर कारणे दाखवा नोटिस पोहवा/१९९६ खुशाल गौरकार, यांना दिनांक १५/०४/२०२३ रोजी तामिल करण्यात आला. कारणे दाखवा नोटीस चे दिलेल्या मुदतीत उत्तर सादर केलेले आहे. उत्तराचे अवलोकन केले असता, उत्तर समाधानकारक आढळुन आलेले नाही. परंतु तुमच्या सेवाकाळाचा सहानुभुतीपुर्वक विचार करून तुम्हाला प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेत अंशत: फेरबदल करून खालीलप्रमाणे शिक्षेचे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी, रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी, पोलीस अधीक्षक, चंद्रपूर या आदेशाद्वारे पोहवा/१९९६ खुशाल गौरकार, नेमणुक पोलीस स्टेशन, गोंडपिपरी यांना त्यांचे उपरोक्त कसुरीबाबत महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६, मधिल नियम क्र. ३(२)(४) नुसार **"रूपये ५००/–(अक्षरी पाचशे फक्त)"** दंडाची शिक्षा देत आहे.

सदर आदेशाने आपण व्यथीत झाले असल्यास हा आदेश नोंद केल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचेकडे द्विप्रतीत योग्य मार्फतीने अपील करू शकता.

# भाग ३ :-बदली/नेमणूक/प्रशिक्षण

महाराष्ट्र पोलीस

महाराष्ट्र शासन

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

स्यातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email ID: spchandrapur@mahapolice.gov.in Phone No 07172-255100/273258 Fax No. 07172-255800

कमांक : पोअचं/एसबी–9/प्रशि.– WATCHER's DUTY /2023 चंद्रपूर, दिनांक 25/08/2023

:: आदेश::

संचालक, महाराष्ट्र इंटिलिजन्स अॅकडमी,राज्य राखीव पोलीस बल गट कमांक–1 परिसर, रामटेकडी पुणे–22 येथे दिनांक 28.08.2023 ते 30.08.2023 पर्यत आयोजीत केलेल्या ' WATCHER's DUTY COURSE NO.8 ' प्रशिक्षणा करिता खालील नमूद पोलीस शिपाई यांची निवड करण्यांत येत आहे.

| अ. क. | प्रशिक्षण | कर्मचा–यांची नावे | कालावधी | प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1 | WATCHER's DUTY COURSE NO.8 | पो.अं./418 श्रीगंत धोंडीबा कदम नेम. पो.स्टे. राजुरा | दि.28.08.2023 ते दि.30.08.2023 | रु. 3,000/– |

महाराष्ट्र शासन

## पोलीस अधीक्षक कार्यालय,चंद्रपूर

Email ID : sp.chandrapur@mahapolice.gov.in Phone No.07172-255100/273258, Fax No.07172-255800

क्रमांक:पोअचं/सीबी-१/कार्यमुक्त/पोउपनि-बेलसरे/२०२३ चंद्रपूर, दि.२९-०८-२०२३

:: **आदेश** ::

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे आदेश क्र.विपोमनि/नाप/डी-३/सार्वत्रिक बदल्या-२०२३/पोउपनि//४५७०/२०२३, दि.३०-०६-२०२३ अन्वये पोलीस उप निरीक्षक श्री.सर्वेश कृष्णाजी बेलसरे, नेमणुक पोलीस ठाणे वरोरा यांची चंद्रपूर जिल्हयातुन वर्धा जिल्हयात बदली झाल्याने त्यांना दि.२९-०८-२०२३ रोजीचे माध्यान्हानंतर पासुन या जिल्हयाचे आस्थापनेवरुन कार्यमुक्त करण्यात येत आहे. आपण आपलेकडील संपुर्ण कार्यभार संबंधीतास सोपवुन बदलीवर रवाना व्हावे. तसेच आपल्या नांवाने असलेले शस्त्र/दारुगोळा न चुकता जमा करावे.

महाराष्ट्र पोलीस

महाराष्ट्र शासन

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

स्यातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email ID: spchandrapur@mahapolice.gov.in Phone No 07172-255100/273258 Fax No. 07172-255800

कमांक : पोअचं/एसबी–11/कोटनाके–स.सा.बदली/2022 चंद्रपुर, दिनांक 31/08/2023

:: आदेश ::

अपर पोलीस महासंचालक, संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे बदली आदेश पोहवा/बियंचा/स.सा.बदल्या/2109/2023 दिनांक 02.06.2023 अन्वये पोहवा (बि.यं.चा.) वंदना धर्मराव कोटनाके, नेम. पोलीस बिनतारी संदेश विभाग, चंद्रपुर यांची पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे आस्थापणेवरुन पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण येथे विनंती बदली झाल्याने त्यांना दिनांक 31.08.2023 रोजी मा.नं.कार्यमुक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन

# पोलीस अधीक्षक कार्यालय,चंद्रपूर

Email ID : sp.chandrapur@mahapolice.gov.in Phone.No.07172-255100/273258, Fax No.07172-255800

क्र.पोअचं/आस्था/एसबी-१/रारापोबल/जिल्हा बदली/हजर/२०२३/ चंद्रपुर दि.३१.०८.२०२३

**-: आदेश :-**

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, गोरेगांव, मुंबई यांचे आदेश क्र. अपोमसं/रारापोबल/०१/जिल्हा बदली/३३/२०२२/१४०१, दिनांक ०५.०७.२०२३ अन्वये राज्य राखीव पोलीस बल गटातील खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची त्यांच्या विनंती वरुन स्वखर्चाने चंद्रपुर जिल्हा पोलीस दलात बदली झाल्याने ते त्यांच्या नावासमोर नमुद तारखेस पोलीस नियंत्रन कक्ष, चंद्रपुर येथे हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर नमुद दिनांकापासुन हजर करुन, त्यांना या आस्थापनेवरील बक्कल क्रमांक देण्यात येत आहे. तसेच त्यांचे नावा समोर नमुद केल्या प्रमाणे त्यांची तात्पुरती नेमणुक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव, हुद्या व पदनाम | जात पदोन्न्ती प्रवर्ग | रवाना दिनांक | चंद्रपूर आमद दिनांक | चंद्रपुर जिल्हा स्विकृती पद | नविन बक्कल नंबर | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सफौ/६९२ प्रशांत कंठीराम गिल्लुरकर | तेली खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १३८५ | पोलीस मुख्यालय |
| ०२ | पोहवा/६९८ देवशरण रामनाथ यादव | गोपाळ खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १३८६ | पोलीस मुख्यालय |
| ०३ | सफौ/७०५ चंद्रमणी रघुनाथ गायकवाड | महार खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १३८९ | पोलीस मुख्यालय |
| ०४ | सफौ/७०८ महेश वसंतराव मोरे | कुणबी खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १३९८ | पोलीस मुख्यालय |
| ०५ | पोहवा/७१३ अतुल सुरेश सुरमवार | बेलदार एनटी ब | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४०९ | पोलीस मुख्यालय |
| ०६ | पोहवा/७३६ प्रशांत लक्ष्मणसिंग बागडी | राजपुत भामटा खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४११ | पोलीस मुख्यालय |
| ०७ | पोहवा/७३९ सुनिल प्रल्हादराव मालोदे | बेलदार एनटी ब | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४१७ | पोलीस मुख्यालय |
| ०८ | पोहवा/७४० प्रमोद दशरथ नागोसे | तेली खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४१८ | पोलीस मुख्यालय |
| ०९ | पोहवा /७४३ धंनजय बंसरोपन सिंग | राजपुत खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४१९ | पोलीस मुख्यालय |
| १० | पोहवा/७६० अमित त्रिभुवन पांडे | ब्राम्हण खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४२४ | पोलीस मुख्यालय |
| ११ | पोहवा/७६३ विलास महादेव जिवणे | महार एस सी | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४२५ | पोलीस मुख्यालय |
| १२ | पोहवा/७६४ प्रविण अमरनाथ गजभिये | महार एस सी | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४२६ | पोलीस मुख्यालय |
| १३ | पोहवा/११२१ सुनिल दयानंद शामला | माली खुला | ३०/०८/२०२३ माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३ माध्यान्हापुर्वी | पोलीस हवालदार | १४३० | पोलीस मुख्यालय |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | पोहवा/११३९<br>सुदर्शन लक्ष्मणराव वकोले | तेली<br>खुला | ३०/०८/२०२३<br>माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३<br>माध्यान्हापुर्वी | पोलीस<br>हवालदार | १४३२ | पोलीस मुख्यालय |
| १५ | पोहवा/११८६<br>येनुनाथ घुसाजी मडावी | गोंड<br>एस टी | ३०/०८/२०२३<br>माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३<br>माध्यान्हापुर्वी | पोलीस<br>हवालदार | १४३३ | पोलीस मुख्यालय |
| १६ | पोहवा/११९३<br>उमेश मोतीराम चामाटे | धनगर<br>एनटी सी | ३०/०८/२०२३<br>माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३<br>माध्यान्हापुर्वी | पोलीस<br>हवालदार | १४४१ | पोलीस मुख्यालय |
| १७ | पोहवा/१२०४<br>गजानन लक्ष्मण चवरे | माना<br>एस टी | ३०/०८/२०२३<br>माध्यान्हानंतर | ३१/०८/२०२३<br>माध्यान्हापुर्वी | पोलीस<br>हवालदार | १४४३ | पोलीस मुख्यालय |

महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email ID: spchandrapur@mahapolice.gov.in Phone No 07172-255100/273258 Fax No. 07172-255800

क्र.पोअचं/सिबी-४/कश्रेली-वश्रेली/कार्यसन बदल/२०२३/ ३७३१ / चंद्रपूर दिनांक : ३०/८/२०२३

## आदेश

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडील आदेशान्वयेया कार्यालयाच्या आस्थापनेवरून कनिष्ठ श्रेणी लिपीक व वरिष्ठ श्रेणी लिपीक यांना बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्यामुळे/कार्यसन रिक्त झाल्यामुळे प्रशासकिय कारणास्तव लिपीक कर्मचारी यांचे कार्यसन बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सध्याचे कार्यसन | नेमणुकीचे कार्यसन | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री रमेश गणपत शेंडे, वश्रेली | वेतन लिपीक एबी-३ | रोखपाल | श्री जयंत उरकुडे, वश्रेली यांना बदलीच्या ठिकाणी पोलीस आयुक्त नागपूर शहर येथे कार्यमुक्त केल्याने रिक्त कार्यसनावर नेमणुक करण्यात येत आहे. |
| २ | श्रीमती निलोफर पठान, कश्रेली | पत्रव्यवहार शाखा सिबी - ४ | वेतन लिपीक एबी - ३ | श्री रमेश शेंडे, वश्रेली यांची रोखपाल येथे नेमणुक केल्याने त्यांचे रिक्त पदावर |
| ३ | श्री जनार्दन शेंदरे, कश्रेली | आस्थापना शाखा एसबी - ६ | पत्रव्यवहार शाखा सिबी - ६ | श्री विनोद मडावी, कश्रेली यांचेकडे असलेले सिबी - ६ या कार्यसनाचे अतिरिक्त कार्यभार आदेश रद्द करून |
| ४ | श्री सचिन खोब्रागडे, कश्रेली | रोखपाल सहायक | आस्थापना शाखा एसबी - ६ | श्री जनार्दन शेंदरे, कश्रेली यांची सिबी-६ या कार्यसनावर नेमणुक केल्यामुळे रिक्त पदावर. |
| ५ | श्री नितीन सोनटक्के, कश्रेली | बदलीवर नविन हजर | रोखपाल सहायक | श्री सचिन खोब्रागडे, कश्रेली यांची आस्था. लिपीक ६ यांच्या बदलीमुळे रिक्त पदावर. |

क्रमांक - पोअचं/एसबी-१/विनंती बदल्या-२०२३/ पोकर्म/२०२३-2466 चंद्रपूर दिनांक - २९/०८/२०२३

# आदेश

संदर्भ :- १) महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०१५ दिनांक - १६/०२/२०१५
२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक - टिआरएफ- २०००/एम/८/ प्र.क्र. ३/बारा दिनांक - ११/०७/२०००
३) पोमसं/३६/र.व का. (८३००)शा.नि. अधिसुचना/०१/२०२२, दिनांक २९/११/२०२२
४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक - बदली- २०२३/प्र.क्र. -३२/कार्या १२, दिनांक - ३०/०५/२०२३

--- ००० --

उपरोक्त संदर्भान्वये **महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील कलम २२ न अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून पोलीस अधीक्षक, चंद्रपूर आस्थापनेवरील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांच्या सर्वसाधारण बदली - २०२३ च्या अनुषंगाने आस्थापना मंडळाच्या निर्णयानुसार** खालील नमुद सहाय्यक फौजदार / पोलीस हवालदार / नाईक पोलीस शिपाई / पोलीस शिपाई यांची त्यांचे कौटूंबिक/वैद्यकिय/पतिपत्नी एकत्रीकरणांतर्गत विशेष कारणास्तव त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची विनंती बदल्या / नेमणुका करण्यात येत आहे. सदर बदली ही विनंतीवरून असल्याने त्यांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

| अ.क्र. | ब.नं. | हुद्दा | नांव | नेमणुक | निर्णय | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ७३५ | पोहवा | कैलाश अर्जून येरमे | धाबा | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 2 | ३६ | सफौ | अरविंद श्रावण कन्नाके | चंद्रपूर शहर | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 3 | २०७१ | पोहवा | रामराव देवराव टेकाम | चंद्रपूर शहर | मान्य | राजुरा |
| 4 | ७९३ | पोहवा | अरुण रामराव मोगरे | रामनगर | मान्य | बल्लारशा |
| 5 | २१४८ | पोहवा | विश्वेश्वर चंदू आलाम | दुर्गापूर | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 6 | ४३२ | पोहवा | दिनेश वसंत वाकडे | घुग्घूस | मान्य | रामनगर |
| 7 | ३७५ | पोहवा | दिनकर बाबूराव गोरकार | नागभिड | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 8 | १९२१ | पोहवा | केवलराम कवडू उईके | नागभिड | मान्य | मुल |
| 9 | १५३२ | सफौ | संजय गोपाळा श्रीकोंडवार | सिंदेवाही | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 10 | ११३५ | पोहवा | शंकर श्रीराम राऊत | सिंदेवाही | मान्य | ब्रम्हपूरी |
| 11 | ६६ | पोहवा | नरेंद्र मुकाजी खोब्रागडे | कोरपणा | मान्य | ब्रम्हपूरी |
| 12 | १९४१ | सफौ | देवानंद लहानू वाकडे | मुल | मान्य | नागभिड |
| 13 | ११०७ | मसफौ | जना शंकर मेश्राम (कुळमेथे) | मुल | मान्य | चंद्रपूर शहर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | ६५० | पोहवा | मुर्लीधर फकिरा टेकाम | पाथरी | मान्य | मुल |
| 15 | ८९३ | सफौ | विनायक गणपत कुळमेथे | राजूरा | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 16 | ७५२ | सफौ | रविंद्र महादेव चेकपुलवार | बल्लारशा | मान्य | वाहतुक शाखा, चंद्रपूर |
| 17 | १९०१ | पोहवा | राजु गोविंदराव लाखे | बल्लारशा | मान्य | दुर्गापूर |
| 18 | ७५५ | पोहवा | किशोर क्रिष्णाजी मांडवगडे | कोठारी | मान्य | गोंडपिपरी |
| 19 | १८३० | पोहवा | राजु हरी राजुरकर | कोठारी | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 20 | १५२७ | सफौ | प्रकाश रामदास हुलके | कोठारी | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 21 | १८४९ | सफौ | बाबा शिवराम तराळे | कोठारी | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 22 | ८१८ | पोहवा | माणिक नानाजी वागदरकर | विरूर | मान्य | गोंडपिपरी |
| 23 | ५९१ | पोहवा | विश्वास कवळू राजगडकर | भद्रावती | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 24 | १७२५ | सफौ | आकाश बबनराव पढाल | माजरी | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 25 | १६७९ | सफौ | सतिश गणपत रायपूरे | भिसी | मान्य | कोठारी |
| 26 | २२८४ | सफौ | चंद्रकांत श्रीहरी पेंद्दीलवार | नविअ, चंद्रपूर (सी- ६०) | मान्य | वाहतुक शाखा, चंद्रपूर |
| 27 | १८८४ | पोहवा | गजानन ज्योतीराम वांढरे | पो. मु. चंद्रपूर | मान्य | दुर्गापूर |
| 28 | ८ | पोशि | रूपेश सुरेश पराते | भारी | मान्य | जिविशा, चंद्रपूर |
| 29 | २४६४ | मपोशि | कु. विजया उत्तम राठोड | लाठी | मान्य | रामनगर |
| 30 | ७०० | पोशि | दशरथ भानुदास होळगीर | दुर्गापूर | मान्य | पिट्टीगुडा |
| 31 | २५२१ | पोशि | विशाल बाबूराव वैरागडे | सिंदेवाही | मान्य | रामनगर |
| 32 | १३६० | मपोशि | अंजली अरूनराव पिपरे | पाथरी | मान्य | विरूर |
| 33 | ८२३ | मपोशि | करिश्मा आदे | गोंडपिपरी | मान्य | धाबा |
| 34 | ७६६ | पोशि | संपत बनय्या पुलीपाका | राजूरा | मान्य | दुर्गापूर |
| 35 | २२७३ | नापोशि | शरद नामदेवराव कुडे | बल्लारशा | मान्य | रामनगर |
| 36 | २२९९ | नापोशि | राहुल प्रभाकर सहारे | विरूर | मान्य | रामनगर |
| 37 | २५११ | पोशि | मा. जावेद वहाबुद्दीन | उप वि पो अ वरोरा | मान्य | सी - ६०, चंद्रपूर |
| 38 | २३११ | मपोशि | वैशाली प्रभुदास सोयाम | भद्रावती | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 39 | ३३६ | मपोशि | रूपाली प्रमोदराव गोंडसे | माजरी | मान्य | सायबर सेल, चंद्रपूर |
| 40 | ९९ | पोशि | अमोल सावे | सायबर पोलीस स्टेशन, चंद्रपूर | मान्य | पडोली |
| 41 | २३५७ | मनापोशि | कु. वंदना शंकरराव बोरसरे | फिंगर प्रिंट कार्या | मान्य | पो. मु. चंद्रपूर |
| 42 | ३१९ | नापोशि | नितीन उपासराव भोजेकर | बिडिडिएस, चंद्रपूर | मान्य | बिडिडिएस (बेलॉ डॉग सह दुय्यम श्वान हस्तक) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 43 | २५२५ | पोशि | प्रदिप राजदेव यादव | श्वान पथक, चंद्रपूर | मान्य | बिडिडिएस (बेलॉ डॉग सह प्रथम श्वान हस्तक) |
| 44 | २१४९ | नापोशि | रुपेश मारोतराव पुल्लेवार | आर सी पी, चंद्रपूर | मान्य | वाहतुक शाखा, चंद्रपुर |
| 45 | २१३८ | नापोशि | जय उमेश सिंह | नविअ, चंद्रपूर (सी- ६०) | मान्य | स्थागुशा, चंद्रपूर |
| 46 | १९६१ | नापोशि | इस्माईल पठाण | नविअ, चंद्रपूर (सी- ६०) | मान्य | घुग्घूस |
| 47 | २५ | पोशि | अमोल अनिलराव आंबाडे | नियंत्रण कक्ष, चंद्रपूर | मान्य | बिडिडिएस, चंद्रपूर (टेक्नीशियन) |
| 48 | ७३४ | पोशि | पंकज रामदास पोन्दे | पो. मु. चंद्रपूर | मान्य | रामनगर |
| 49 | १०१० | पोशि | अमोल लोनबले | पो. मु. चंद्रपूर | मान्य | ब्रम्हपूरी |
| 50 | १०४९ | पोहवा | मो.शकील शेख वहाब | नियंत्रण कक्ष, चंद्रपूर | मान्य | सायबर पोलीस स्टेशन, चंद्रपूर |
| 51 | २८७२ | मपोशि | कु. शानुबाई उमाजी चव्हाण | मुल | मान्य | धाबा |

महाराष्ट्र शासन

# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email ID: spchandrapur@mahapolice.gov.in Phone No 07172-255100/273258 Fax No. 07172-255800

क्र.पोअचं/सिबी-४/कार्यमुक्त/वश्रेली-उरकुडे/२०२३/ ३११४८ / चंद्रपूर दिनांक : २९ /८/२०२३

## आदेश

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडील आदेश क्र. विपोमनि/नाप/डि-४/जिल्हा / वश्रेली/विनंती बदली -२०२३/२०२३/३६०९ नागपूर दिनांक २९/५/२०२३ अन्वये **श्री जयंत उरकुडे, वश्रेली** यांची पोलीस अधीक्षक चंद्रपूर ते पोलीस आयुक्त नागपूर शहर येथे विनंतीने बदली झाल्याने बदलीच्या ठिकाणी हजर होणेकरीता या कार्यालयाच्या आस्थापनेवरून **दिनांक ५/९/२०२३ च्या माध्यान्हानंतर** पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन

# पोलीस अधीक्षक कार्यालय,चंद्रपूर

Email ID : sp.chandrapur@mahapolice.gov.in Phone No.07172-255100/273258, Fax No.07172-2558

क्र.पोअचं/आस्था/एसबी-१/संलग्न/२२६६/खोब्रागडे/२०२३ चंद्रपुर दि.३०.०८.२०२३

## -: आदेश :-

चापोहवा/२२६६ देवकुमार खोब्रागडे नेमणुक मोटार परिवहन विभाग, चंद्रपुर त्यांनी केलेल्या विनंती वरुन त्यांना प्रकृत्तीच्या कारणास्तव पुढील आदेश होईस्तोवर त्यांना तात्पुरते पोलीस मुख्यालय, चंद्रपुर येथे संलग्न करण्यात येत आहे.

क्रमांक :- पोअचं/विचौ-२/बदली/मनापोशि-८३ परविन पठाण/२०२३, चंद्रपूर दिनांक :- २९/८/२०२३

:: आदेश ::

